# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक २९.०४.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २८.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १९ केसेसमध्ये १९ ईसमावर कारवाई करून एकुण ३१,२०५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून एकुण २,३४५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,५२८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२१,७५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) अजनी पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २८.०४.२०२६ चे २०.५० वा. सुमारास, अजनी पोलीसांचे तपास पथकास माहिती मिळाली की, पोलीस ठाणे अजनी हद्दीत चिमणी चौक, ठवरे शाळेजवळ, एक ईसम एम.डी. पावडर विक्रीकरीता येणार आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून, अजनी पोलीसांचे तपास पथकाने नमुद ठिकाणी पंचासमक्ष सापळा रचून काळ्या रंगाच्या एन.टॉर्क. मोपेड दुचाकी क्र. एम. एच. ४९ ए.झेड ६४२७ चे चालकास घेराव टाकुन ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव हर्षल राकेश ब्राम्हणे, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. २२, त्रिमुर्ती नगर, भेंडे ले—आऊट, मोखारे कॉलेजजवळ, सोनेगाव, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची व दुचाकीची झडती घेतली असता, त्याचे ताब्यातील एन.टॉर्क. मोपेड दुचाकी क्र. एम. एच. ४९ ए.झेड ६४२७ चे डिक्कीत एका पांढरे झिपलॉक पन्नीमध्ये १८ ग्रॅम २०० मिलीग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०५ रिकाम्या झिपलॉक पन्नी, ०६ वेगवेगळे मोबाईल फोन, मोपेड गाडी असा एकुण १,९३,८००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब) एन.डी. पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नविनचंद्र रेड्डी प्रभारी पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री नरेंद्र हिवरे सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीनचंद्र रजकुमार, पोउपनि. सिध्दांत मस्के, पोहवा. ओमकार बाराभाई, पोअं. नरेश श्रावणकर, मनिष भल्मे, दादाजी माडेमवार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे धंतोली :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २८.०४.२०२६ चे ११.१५ वा. ते ११.३० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे काका नामे दुधराव लक्ष्मण पाटील, वय ६५ वर्षे, रा. ऑरेंज सिटी हॉस्पीटल मागे, देवनगर, नागपूर हे आपले सायकलने अजनी चौकातून मेडीकल हॉस्पीटल येथे जात असतांना पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, एफ.सी.आय. गोडावूनचे गेटसमोरील सिमेंट रोडवर त्यांचे मागून येणाऱ्या एका स्विप्ट डिझायर कार क्र. एम.एच. ३१ एफ.ए. ८०८९ चे चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे काकाचे सायकलीस जोरदार धडक देवून त्यांना गंभीर जखमी करून कोणतीही मदत न करता पळून गेला. गंभीर जखमी फिर्यादीचे काका यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २८. ०४.२०२६ चे २३.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी पवन देवराव पाटील, वय ४५ वर्षे रा. रामबाग, ईमामवाडा, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे पोउपनि शुभम बकाल ९१५६४४७०१७ यांनी कार चालकाविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी:— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २४.०४.२०२६ चे ०८.०० वा. ते दिनांक २५..०४.२०२६ चे ०७.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, प्लॉट नं. ३८६, सेक्टर नं. २८, खापरी पुनर्वसन, शंकरपूर टर्निंग, बेलतरोडी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी सतिष भिमदेव झाडे, वय ४० वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह वडीलांना भेटण्याकरीता तुळजापूर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी व लोखंडी आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,१३,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. श्रीकांत गोरडे ८२९०८७१७४२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात)**

**पोलीस ठाणे सोनेगाव** :— दिनांक २८.०४.२०२६ चे १६.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सोनेगाव हद्दीत, मिहान उड्डाणपुलाखाली पिल्लर क्र. ०५ जवळ एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आले, त्यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतक ईसमाची ओळख अद्याप पटलेली नाही. **वर्णन** रंग— गोरा, बांधा— सळपातळ, चेहरा—

लांब, नाक— सरळ, डोक्याला टक्कल केलेले, ओळख— उजव्या हातात लाल रंगाचा व कमरेला काळा धागा बांधलेला आहे. अंगात— निळ्या रंगाचा हाफ पॅन्ट घातलेले आहे.

यावप्रकरणी फिर्यादी राज हरीदास लोखंडे, वय २७ वर्षे, रा. खापरी रेल्वे, बुध्द विहाराजवळ, सोनेगाव नागपूर यांचे सुचनेवरून पोलीस ठाणे सोनेगाव येथे पोउपनि. प्रमोद मोहिते यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे बेलतरोडी</u> :—** कु. पुजा सचिन म्हैसमारे, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं.८०/८१, काचोरे पाटील नगर, पारूल ब्युटी पार्लर, चिंचभवन, वर्धा रोड, बेलतरोडी, नागपूर ही दिनांक २६.०४.२०२६ चे १९.०० वा. पासुन पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतुन, घराच्या जवळील हनुमान मंदीर येथे महाप्रसाद घेण्याकरीता गेली हाती, ती कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे लांब, अंगात— फिक्कट गुलाबी रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते. ओळख— डोक्यावर व डाव्या पायाचे मांडीवर जुन्या जखमांचे निशान आहे. सोबत— गळ्यात एक तोळ्याची सोन्याची चैन व पायात चांदीची चाळ तसेच, विवो कंपनीचा मोबाईल ज्यामध्ये जियो कंपनीची सिम आहे. मो.नं. ७६६६९३६२५८ असा आहे.



पुजा

**स्वा/—**

**( मनोज राऊत )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**